PTVA Schools

# दर्पण

दिवाळी विशेष अंक





# अनुक्रमाणिका




Diwali is all about making a difference | Pg 4



Diwali's Global Radiance: The Festival of Light Illuminates Hearts Worldwide | Pg 8



PTV (ICSE) students hold the fort at the Killa-making activity | Pg 9



दिवाळी फराळाची हास्यजत्रा | Pg 11



दिवाळी अंक: उत्तम साहित्याचं शिखर | Pg 12



| PTVA's EMS Andheri | PTV ICSE | PTVEMS | Pg 14-17



| पार्ले टिळक विद्यालय मराठी प्राथमिक | माध्यमिक विभाग | परांजपे विद्यालय प्राथमिक | माध्यमिक विभाग | Pg 18-21



Diwali Puzzle, Quiz, Sudoku and more | Pg 23



**अतिथी संपादक : बन्सीधर धुरंधर,** मानद पदाधिकारी, संचालक मंडळ, पार्ले टिळक विद्यालय असोसिएशन

**संपादक : जान्हवी खांडेकर,** मुख्य समन्वयक, पार्ले टिळक विद्यालय असोसिएशन

**मुखपृष्ठ : शिल्पा जाधव,** शिक्षिका, पार्ले टिळक विद्यालय इंग्लिश माध्यम, प्राथमिक विभाग

**मलपृष्ठ : सौ. आरती काटदरे,** चित्र (मंडला / मधुबनी) परांजपे विद्यालय

**मुद्रक आणि प्रकाशक : दैनिक ठाणेवैभव,** दुसरा मजला, एडीजॉन, अल्मेडा सिग्नल जवळ, एलबीएस मार्ग, ठाणे (प)

# संपादकीय



**बन्सीधर सदाशिव धुरंधर**
**मानद पदाधिकारी,संचालक मंडळ,**
**पार्ले टिळक विद्यालय असोसिएशन**



सर्वप्रथम दर्पण वार्तापत्राच्या छोट्या व मोठ्या अशा सर्व वाचकांना दीपावलीच्या अनेकोत्तम हार्दिक शुभेच्छा!!

महाराष्ट्रातील आपल्या या अग्रगण्य व नामांकित शैक्षणिक संस्थेचा एक संचालक या नात्याने गेली २६ वर्षे मला आपल्या संस्थेसाठी काम करण्याची जी सुसंधी प्राप्त झाली त्यासाठी मी स्वतःला खरोखरच भाग्यवान समजतो. पार्ले टिळक विद्यालय आणि पार्ले (साठ्ये) महाविद्यालयाचा मी एक माजी विद्यार्थी. त्यामुळेच या संस्थेप्रती कायमच आपण ऋणी असल्याचा भाव नकळतच अंतर्मनात जपला गेला आहे. आणि आज जेव्हा मला आपल्या या 'दर्पण' वार्तापत्राच्या दीपावली विशेषांकासाठी संपादकीय लिहिण्याची गोड जबाबदारी सोपवण्यात आली आहे; तेव्हा ही विनम्रतेची भावना अधिकच गडद होत आहे. सुहृदहो, त्याला कारण देखील तसेच आहे.... आपल्या पार्ले टिळक शैक्षणिक संस्थेअंतर्गत असलेल्या सर्व शाळांचे एक मुखपत्र असावे अशी कल्पना कित्येक वर्षे आपण सर्वांनी एखाद्या सुखद स्वप्नासारखी उराशी जपली होती. आपल्या विविध शाळांचे उपक्रम, तसेचआपल्या शाळांची, शिक्षकांची व विद्यार्थ्यांची उल्लेखनीय कामगिरी, संस्थेतील इतर शाळांना समजावी व या माहितीच्या आदान-प्रदानामुळे, त्यातून मिळणाऱ्या प्रेरणेमुळे सर्वांचाच सर्वांगीण विकास व्हावा हे या मागचे प्रमुख उद्दिष्ट. पण अन्योन्य कारणांमुळे योग जुळून येत नव्हता. दि. २६ जानेवारी २०२३ या शुभ मुहूर्तावर हे स्वप्न प्रत्यक्षात उतरले. आपल्या 'दर्पण' चा पहिला अंक प्रकाशित झाला. आजवर 'दर्पण' चे प्रतिमास एक याप्रमाणे ९ अंक प्रकाशित झाले आहेत. आणि यापुढेही ते नियमितपणे प्रकाशित होतीलच. या यशाचे, या स्वप्नपूर्तीचे मोठे श्रेय, व्यासंगी व प्रतिभावंत समन्वयक सौ. जान्हवी खांडेकर व मुद्रण क्षेत्रातील अनुभव संपन्न व मेहनती अशा 'ठाणेवैभव'च्या संपूर्ण टीमचे आहे. आणि अर्थातच या वार्तापत्रासाठी विपुल प्रमाणात लेख व अन्य उद्बोधक माहिती पुरवून उत्स्फूर्तपणे सहभागी होणाऱ्या, सकारात्मक प्रतिसाद देणाऱ्या सर्व मुख्याध्यापक, शिक्षक आणि विद्यार्थ्यांचा वाटा तर सिंहाचा ठरावा...!! या सर्व पार्श्वभूमीवर, मला या दीपावली विशेषांकासाठी संपादकीय लिहिण्याचा मान मिळणे हे मी माझे पूर्वसंचितच समजतो आणि वर नमूद केल्याप्रमाणे मनातील विनम्रतेची भावना अधिकच गडद होते.!!

लहानपणी आम्ही जेव्हा अभ्यास किंवा गृहपाठ करायला टंगळ-मंगळ करायचो तेव्हा आमचे आजोबा आम्हाला नेहमी २ संस्कृत सुभाषिते ऐकवायचे. ती आज मुद्दाम येथे उद्धृत करावीशी वाटतात.

**अलसस्य कुतो विद्या, अविद्यस्य कुतो धनम् |**
**अधनस्य कुतो मित्र:, अमित्रस्य कुत: सुखम् ||**

(ज्ञानार्जनात जर आळस करशील तर धन कसे मिळवशील? आणि ज्याच्याकडे धन नाही, पैसा नाही त्याला मित्र नाहीत आणि ज्याला आप्त मित्र नाहीत तो सुखी कसा होईल ?)

**न चोरहार्यं न राजहार्यं न भ्रतृभाज्यं न च भारकारि |**
**व्यये कृते वर्धति एव नित्यं विद्याधनम् सर्वधनप्रधानम्||**

(जे धन कधीही कोणी चोरून नेऊ शकत नाही, जे धन कोणताही राजा आपल्याकडून हिसकावून घेऊ शकत नाही, भावा- भावांमध्ये ज्या संपत्तीची कधी विभागणी होऊ शकत नाही, ज्या संपत्तीचा कधीही भार होत नाही, जे धन जेव्हढे खर्च कराल तेव्हढे वाढतच जाते ते विद्यारूपी धन हेच सर्व धनांमध्ये श्रेष्ठधन..! म्हणूनच हे धन मिळविण्यासाठी कधीही आळस करू नकोस...!!)

आज मुद्दाम ही सुभाषिते येथे उद्धृत करण्याचे कारण असे की आपल्या शिक्षण संस्थेनेच नव्हे तर येथून शिक्षण घेऊन बाहेर पडलेल्या विद्यार्थांनी देखील उपरोल्लेखित सुभाषितांना आपल्या आयुष्याचेभागध्येय मानून आपल्या असामान्य बुद्धिमत्तेने व असीम कार्यकर्तृत्वाने समाजावर आपला अमिट ठसाउमटविला आहे. आपल्या संस्थेने घडवलेले अगणित विद्यार्थी आपल्या संस्थेच्या वैभवशाली परंपरेची व १०२ वर्षांच्या अभिमानास्पद वाटचालीची मोठ्या दिमाखाने साक्ष देत आहेत. आणि याचे मुख्यकारण म्हणजे आपल्या संस्थेने काळानुसार व परिस्थितीनुरूप अंगिकारलेले, आत्मसात केलेले बदल..!!

शाळेच्या इमारती असोत की खेळांसाठी आवश्यक असलेले कृत्रिम टर्फ, पुर्वीच्या काळातील 'छडीलागे छम छम....' हा विद्येचा मंत्र असो किंवा आजच्या युगातील 'माहितीचे महाजाल' अर्थात् 'इंटरनेट' चे ज्ञानप्राप्तीचे तंत्र; आपण प्रत्येक बदलाचे खुल्या मनाने स्वागत केले, त्यांना आत्मसात केले. अनेकआव्हानांना समर्थपणे तोंड देऊन, वाटेतल्या प्रत्येक अडचणीचे रूपांतर सुसंधीमध्ये परिवर्तीत करूनआपण ही १०२ वर्षांची वाटचाल यशस्वी केली. आपल्यासाठी संस्मरणीय व इतरांसाठी पथदर्शक बनवली. कारण आपले ध्येय व उद्दिष्ट एकच होते व राहील - संस्थेतील प्रत्येक विद्यार्थ्याला त्याच्या बौद्धिक व आर्थिक कुवतीनुसार शिक्षणाची संधी उपलब्ध व्हायला हवी.

....आणि आता आपल्या संस्थेला वेध लागले आहेत ते येऊ घातलेल्या नव्या 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे'..!! खरं सांगायचं तर स्वातंत्र्य प्राप्तीनंतर सुद्धा आपल्या मानसिकतेवर, आपल्या विचारांवर आणि अर्थातच आपल्या शिक्षण पद्धतीवर १५० वर्षांच्या पारतंत्र्याचे जोखड होते. त्यामुळेच आपण गुरुकुल शिक्षण पद्धती नुसार विद्यार्थी होऊन, ज्ञानार्जन करून, जीवनाभिमुख शिक्षण घेऊन खऱ्याअर्थाने शहाणे करणारी आपली वैभवशाली शिक्षणपद्धती सोडून अनावश्यक पण सक्तीच्या विषयांचा तात्पुरता अभ्यास करून निव्वळ परिक्षार्थी होण्यात धन्यता मानू लागलो. आपले समग्र धर्मग्रंथ, वेद, पुराणे यांमधून गुरुकुल शिक्षण पद्धतीचे अनेक दाखले मिळतात. भगवान श्रीकृष्णानेदेखील सांदीपनी ऋषींच्या आश्रमात राहून १४ विद्या व ६४ कलांचा अभ्यास केल्याचा तपशील आढळतो. आपल्या सगळ्यांचे लाडके दैवत श्री गणपती हे देखील १४ विद्या व ६४ कलांचे धनी आहेत. नव्याने येऊ घातलेल्या 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये' कदाचित अशा मुख्य १४ विद्या व ६४ कलांचा समावेश असू शकतो ज्या आपल्याला खऱ्या अर्थाने जीवनाभिमुख शिक्षण देतील व शहाणे बनवतील.

खरोखरच आपले धर्मग्रंथ, आपल्या वैभवशाली परंपरा व विविध सणवार देखील आपल्याला किती मोलाचे संदेश व शिकवण देतात पहा. नुकताच संपन्न झालेला गणेशोत्सव आपल्याला विविध कला व विद्यांचे अध्ययन करण्यास सांगतो, त्यानंतर घटस्थापना - आदिशक्ती दुर्गामाता शत्रुंवर विजय मिळवून विजयाचे सीमोल्लंघन करण्यासाठी आपणास प्रेरणा देते आणि दिव्यांचा उत्सव दिवाळी आपल्याला जीवनाकडे सकरात्मकतेने पाहायला शिकविते.

श्री गणरायाच्या कृपाप्रसादाने व आदिशक्ती दुर्गामातेच्या आशीर्वादाने; आपले आयुष्य, दिवाळीमधल्या रांगोळीसारखे रंगीबेरंगी व आतषबाजीप्रमाणे प्रकाशमान होवो अशा पुन्हा एकदा मन:पूर्वक शुभेच्छा...!!

# DIWALI IS ALL ABOUT MAKING A DIFFERENCE

## PTVA schools' compassionate and responsible festive celebrations

आत्मनो मोक्षार्थं जगद्धिताय च,
प्रयस्य धर्मार्थिनःसमर्पयेत् ।

The above words highlight the importance of selfless service and the significance of dedicating oneself to the well-being and welfare of others and upholding righteousness. These words have never failed to inspire us all at Parle Tilak Vidyalaya Association.

We, the schools of Parle Tilak Vidyalaya Association, believe in the words of Mahatma Gandhi: "Education, if it is a vital thing, must spread its fragrance in the surroundings." We believe in teaching our children to be generous as it helps to develop love, compassion, empathy and care towards others. We always remind them to share their time, resources and kindness with those in distress and need. Teaching them to reach out and make a world of difference also helps develop a sense of gratitude in our children for what they have.

Here are a few things our schools practise to mould our students into responsible citizens and great human beings.

At Parle Tilak Vidyalaya English Medium, both Primary and Secondary students continue the meaningful and eco-friendly way in which we have been celebrating Diwali for several years. Students are encouraged to refrain from bursting crackers and contribute the money they would have otherwise spent on crackers to an orphanage in Mumbai, 'Vatsalya Trust'. This serves the dual purpose of not only sensitising the students towards the importance of social service but also saving the environment from the ill effects of crackers used during different festivals and other celebrations. Another commendable activity by the school's Primary section is 'Eco Fiesta', which promotes eco-conscious festivals. In association with the NGO RSRR (Our Society Our Responsibility), we have prepared our young Eco Soldiers to create awareness about celebrating an eco-friendly Diwali without plastic and thermocol decorations, recycling flowers for compost and responsible segregation and recycling of dry, wet and e-waste.



**"ONE PERSON CAN MAKE A DIFFERENCE, AND EVERYONE SHOULD TRY." - JOHN F. KENNEDY. HOW TRUE! AS WE ARM AND EQUIP OUR CHILDREN TO CONQUER THE WORLD WITH VALUES OF LOVE, CARE, SYMPATHY, EMPATHY, COMPASSION AND UNDERSTANDING, WE ARE REST ASSURED THAT THE FUTURE LIES IN GREAT HANDS!**

Equally commendable and exemplary are the Parle Tilak Vidyalaya (ICSE) school's initiatives. One such initiative is the 'Heartfelt Gift-Giving Initiative'. Embracing the spirit of generosity and compassion, our ICSE school, through its acts of kindness, illuminates the Diwali celebrations for the less fortunate children. The entire school, from Grades 1 to 10, the staff and the Principal join hands collectively and gather abundant treasures for those in need. The response has always been overwhelming, with students, staff and even parents contributing items that, though no longer in use, retained their quality and value. The donations encompass a wide array of essentials, including books, toys, clothing, shoes and bags. Some parents even devote their time and culinary skills to preparing delectable laddoos and thoughtfully pack them in gift boxes. All these precious offerings are transported to Shamlatai Bidkar Ashramshala, Vare, Dindori, a place of hope for many underprivileged children. The moment the bus, laden with these gifts of love, reaches its destination, a sense of anticipation fills the air. Eager children hurry to discover their perfect Diwali surprises. As the children of Parle Tilak Vidyalaya ICSE celebrate the Joy of Gifting, the young recipients at the Ashramshala are filled with joy and gratitude, their hearts brimming with the warmth of the gifts they have received. This heart-warming gesture exemplifies the true essence of Diwali, uniting all in the spirit of giving and sharing.

Let's empower our children. Let's teach them that in the end, only goodness matters, and only love remains.

Here's wishing each one of you a Happy Diwali!



# "Fire"less celebrations of Diwali

## Relish delectable delicacies with your friends and family

**Learning to cook is an important life skill that instils independence and fosters self-confidence, especially in children. Cooking encourages experimentation with ingredients and finding solutions to cooking challenges, developing creativity and problem-solving skills.**

**At Parle Tilak Vidyalaya English Medium School (Secondary Section), our boys showcased their culinary skills by whipping up lip-smacking sweet recipes. They extend their warm Diwali wishes to each one of you.**

### Recipe 1: Peda



**Ingredients:**
- 1 cup peanuts
- ¼ cup cashews
- ½ cup sugar
- Cardamom powder
- 2-3 tsp milk

**Preparation Method:**
1. In a mixer, crush 1 cup of peanuts and ¼ cup of cashews.
2. Transfer the crushed peanuts and cashews to a bowl.
3. In a separate bowl, mix ½ cup of sugar powder with cardamom powder.
4. Combine the two mixtures in one bowl.
5. Add milk to the mixture and knead it into a dough.
6. Take small pieces of dough and shape them into peda.
7. Allow the peda to dry for some time.
8. Sprinkle peanut powder on top of the peda before serving.

**Time taken:** 20 minutes
**Tip:** Use pre-roasted peanuts and cashews.

### Recipe 2: Paneer Coconut Ladoo



**Ingredients:**
- 1 cup desiccated coconut
- 1/4 cup crumbled paneer
- 1/4 cup powdered sugar
- 1 tsp cardamom powder
- 4-5 tsp rose water
- Chopped nuts or dried fruits for garnishing

**Preparation Method:**
1. In a large bowl, mix the desiccated coconut, powdered sugar and cardamom powder.
2. Add the crumbled paneer and mix well.
3. Gradually add rose water to the mixture and mix well.
4. Take small portions of the mixture and roll them into small balls (ladoos).
5. Coat each ladoo with coconut mixture and garnish with chopped nuts or dried fruits.
6. Store the ladoos in an airtight container.

**Time taken:** 15 minutes
**Tip:** Use fresh paneer and coconut for soft and moist ladoos.

### Recipe 3: Dry Fruit Barfi



**Ingredients:**
- 2 cups seedless dates
- 1 cup roasted dry fruits of your choice
- 1/2 tsp cardamom powder

**Preparation Method:**
1. Soak the seedless dates in warm water for 30 minutes.
2. Drain the water and blend the dates into a fine paste.
3. In a bowl, mix the dates paste, roasted dry fruits and cardamom powder.
4. Spread the mixture on a greased tray and refrigerate for 2-3 hours.
5. Cut the barfi into pieces and enjoy

**Time taken:** 10 minutes
**Tip:** Use moist dates as a natural sweetener and binder.

### Recipe 4 : Chocolate Ladoo



**Ingredients:**
- 2 packets of Oreo cookies
- 2 spoons of fresh malai (cream)
- 1 large spoon of milk
- Cocoa powder
- 1 cup of cashews

**Preparation Method:**
1. Crush the Oreo cookies in a mixer until finely ground.
2. Add 2 spoons of fresh malai and 1 large spoon of milk to the ground Oreo cookies. Mix well until a soft dough forms.
3. Take small pieces of dough and roll them into ball shapes.
4. Sprinkle cocoa powder on the ball-shaped dough and top with a cashew.
5. Your chocolate ladoo is ready!

**Time taken:** 10 minutes
**Tip:** Use good quality malai and chocolate to get the best results.

**Contributed by**



Atharva Kasar, VIII A, PTVEMS



Shardul Sawant, VIII A, PTVEMS



Harshad Gawai, VIII A, PTVEMS

Adobe Stock | #519870822

# Let's spread smiles and cheers this Diwali

Diwali, the Festival of Lights, is a joyous celebration that inspires us to give back to our community. It goes beyond the flashy and glamorous aspects of the festival and encourages us to be more generous and selfless. During Diwali, families, friends, and neighbours come together not only to celebrate but also to share their joy with those who are less fortunate. It reminds us that true wealth lies in our willingness to share with others.

Charity is a significant part of Diwali's tradition. It is a time when people donate to charitable organisations, provide food for those in need, and support various social causes. Diwali also emphasises the importance of family and community, urging us to extend our kindness beyond our loved ones and consider the welfare of the broader community.



Soham Joshi,
IX D, PTVEMS

The Festival of Lights symbolises the victory of light over darkness and good over evil. In a world filled with sorrow, Diwali motivates us to not only light lamps but also to help those in need and work towards improving the world. Diwali inspires us to build a happier society, and acts of charity during this time often lead to ongoing efforts to improve the lives of marginalised communities, creating a fairer society.

We can take several actions to contribute to the spirit of Diwali. Firstly, we can volunteer to help non-profit organisations or public events that require volunteers. Additionally, we can donate to local charity organisations to help improve the lives of the less fortunate. Participating in environmental events such as tree-plantation drives or awareness programmes is another way to make a positive impact. It is also important to offer our appreciation to local service providers such as cleaners and doctors, recognising their contributions.

Small acts of kindness can go a long way. Lastly, Diwali is about spreading happiness and supporting the less fortunate. It motivates people to continue their charitable work even after the festival ends. Diwali serves as a beautiful reminder of our duty to help others and encourages us to work towards a happier and more generous world.



# The Gift of Light

I was sitting on the armchair, wondering what it felt like to celebrate festivals. I was born blind, but according to my doctor, I would soon get a donor, and I would be a normal human for once. Diwali was around the corner, and all I hoped was to see the light. Since I was a baby, my grandmother told me different mythological stories, and Valmiki's Ramayana was one of my favourites. The festival of Diwali revolves around the return of Ram after defeating Ravana and the celebration in Ayodhya when the city was lit up with lights. I always hoped that I would get to celebrate Diwali at least once in my lifetime.

Earphones were plugged into my right ear, and I was listening to the songs in full blast when I heard a dull ringtone in the background. I could hear the dangling of my mother's anklet and her hurried footsteps. It was probably because somebody had called her. I could hear my mother's soft voice. She repeated the words "Thank you. May the Lord be with you" continuously for two minutes. As she hung up her phone, she ran towards me and grabbed my shoulders, hugging me. I could feel her tears roll down her cheeks, falling onto my shoulders and making my t-shirt wet. She whispered in my ear, "God finally fulfilled our wishes. You would be getting a pair of eyes." I couldn't hold back my happiness. I jumped from the armchair, hitting my toe on the nearby table, but I didn't care. I was elated because I was going to get my vision and I was going to celebrate Diwali. The following few weeks went in anticipation.



Anayaa Sawant,
IX A, PTV (ICSE)

I did get myself a pair of eyes, but I was constantly being taken to the hospital. After the transplant, when the doctors untied the bandage from my eyes, I instantly opened my eyes, and white light sparkled all around me. It took me a while to focus. Then I saw a lady looking at me with tears in her eyes. It was when she started speaking to the doctor that I realised that she was my mother. She opened her arms, giving me a warm hug. The journey from the hospital to my home was truly one of the best experiences in my life. I got to see cars as I was always curious about them because of their honking. When I returned home from the hospital, I saw a three-dimensional hexagon-shaped paper hanging on the window. I went near it and felt it. It reminded me of my grandmother's description of a thing very similar to this called a 'lantern'. It took me a moment to process that it was Diwali, the festival of lights. In the evening, the entire apartment was lit with all different sorts of light. I was in complete awe. The view outside my window was breathtaking. I saw a bunch of kids bursting firecrackers on the road. I had heard the disturbing noises of the firecrackers earlier, but when I saw the different colours exploding in the sky, the firecrackers no longer felt disturbing. They were like therapy to me. The various patterns they made in the dark sky were truly mesmerising.

It was during these four days of Diwali that I got to learn a lot. The first day was "Dhanteras". Dhanteras is when Lord Dhanvantari is worshipped. According to Hindu traditions, Dhanvantri emerged during Samudra Manthan. Narak Chaturdashi marked the second day of Diwali. It is celebrated on the no-moon night before Diwali. The third day was Diwali, when people lit up lamps or diyas to celebrate the killing of Ravana and the banishment of evil and darkness from the earth. On the fourth day, Govardhan puja and Bhai Dooj were celebrated. For the Govardhan Puja, the devotees prepared a hill of cow dung that represented Mount Govardhan. They decorated their mountains with flowers and rangoli and offered prayers to Lord Govardhan to protect their families from bad deeds. For Bhai Dooj, the sisters invited their brothers for a meal, including their favourite dishes and sweets. The whole ceremony signified the duty of a brother to protect his sister, as well as a sister's blessings for her brother.

As I lived through these four days, witnessing the beautiful sights for the first time, I realised I had found my Lord Ram, who gave me the 'Gift of Light'.

**The article is a work of fiction**



# PTVA's EMS, Andheri Thanks the Thankless this Diwali!







Flowers die, and sweets get eaten, but a paper greeting card lasts forever!

Grade VII students of PTVA's English Medium School, Andheri, prepared special Diwali Greeting Cards under the guidance of the Art Teacher, Mrs Ashwini Naravane. These cards were made to express gratitude, appreciation, and affection towards community helpers like the housekeeping staff,





security guards, canteen service providers, school van operators, traffic police, and domestic help, among others.

The love and warmth of the greeting cards doubled as they were gifted with homemade herbal Ubtan prepared by the school staff.

The creatively prepared, beautiful cards with heartfelt messages havesentimental value and will be cherished by the receivers for years.

# Diwali: A Festival of Lights and Joy

When we hear the word Diwali, we envision bursting firecrackers and illuminating diyas. Diwali, known as the festival of lights, transforms our surroundings. People light diyas and lanterns and ignite firecrackers, turning it into a radiant celebration. Typically falling between mid-September and mid-November, Diwali marks the return of Lord Rama, Sita, and Lakshmana to Ayodhya after their victory over Ravana.



Vivaan Gadre,
V B, PTV (ICSE)

During Diwali, people wear new clothes and indulge in making a variety of sweets. The night sky dazzles with fireworks that paint vibrant patterns. I recall my first encounter with firecrackers, a phuljhadi that left me with a burnt finger because I accidentally touched the top of it when it burned out. I hesitated for two days but then learned from my mistake!

There is so much to do on Diwali. My mother and grandmother craft delicious sweets while my grandfather, sister, and I create lanterns. Last year, we went on a trip to Uttarakhand for a memorable Diwali. At our hotel, the management surprised us with an abundance of firecrackers. We had a blast lighting them. However, I missed celebrating with my friends back home.

On our return, my friends and I lit up all the firecrackers we had except for the rockets. The rockets were lit on the following night with all my family members. The thrill was unmatched. My mischievous sister had secretly stashed a box of pop-its, which she'd toss near our feet, startling us.

The joy of fireworks comes with a warning; they can be harmful. The noise pollution affects mental and physical health, and many pets are terrified of the sudden sounds. Smoke from fireworks may lead to breathing issues like asthma. To celebrate responsibly, let's limit the use of noisy fireworks and opt for phuljhadis. This way, we can ensure a healthy, happy, and enjoyable Diwali for all.

# Diwali's Global Radiance: The Festival of Light Illuminates Hearts Worldwide

Diwali, the luminous festival of light, is a highly anticipated occasion that unites young and old. It beckons the warmth of family and friends, a time for the exchange of heartfelt gifts, and the transformation of homes into vibrant and radiant abodes. The festive air is rich with the aroma of delectable dishes, bringing together loved ones who may have been distanced by time and circumstance.

This celebration's brilliance transcends borders, shining not only across the vast expanse of India but also in numerous other countries. A poignant testament to Diwali's universality, our students of Parle Tilak Vidyalaya (ICSE) have shared captivating images of their relatives abroad, partaking in the festivities with the same enthusiasm and zest. These snapshots serve as a powerful reminder that Diwali is a luminous thread that binds hearts worldwide, transcending geographical boundaries to ignite joy and togetherness.

Aarya Ganu, a Grade II-C student, described how her extended family in San Jose, California (USA), celebrates Diwali. They prepare a variety of sweets, including Karanjis, Motichoorladdoos, and barfis. They decorate their homes with diyas and lanterns in the evening after dusk. Diwali evenings are spent meeting family and friends. They dress in beautiful traditional Indian attire and enjoy the "festival of lights" by lighting firecrackers. They also attend and participate in cultural, dance, and musical events organised by their Indian community group.





Sanvei Patil, a Grade II-A student, shared the vibrant Diwali celebration of her aunt in Melbourne, Australia. Her aunt's family prepares traditional sweets at home, and every household member contributes to a thorough cleaning. The Indian families in their area come together to celebrate. They narrate the Diwali story in English and Hindi to children, fostering an appreciation for its significance. Since they miss India a lot, they sing Indian Independence songs, including the national anthem, during their Diwali celebrations. They don new clothes, illuminate their home, and share sweets with neighbours who hail from diverse backgrounds but understand the emotional importance of the day.





Sara Bapat, a Grade III-C student, narrated how her extended family celebrates Diwali in Wilton, Connecticut, a town close to New York City. They create rangoli and decorate their homes with lights. The neighbourhood plans activities such as dancing and singing on Diwali. They wear traditional Indian clothing, visit the homes of people celebrating Diwali, and have festive lunches while exchanging Diwali sweets.



Kavya Karanth, a Grade IV-D student, gave a glimpse of the pictures of her aunt celebrating Diwali with her family in Leeds, UK, last year. Her aunt's family celebrate by decorating their home and doing pooja.



Swara Palekar, a Grade V-B student, recounted that her aunt, who lives in the USA, brings diyas from India, paints them with acrylic colours, and decorates her home during Diwali. She also creates paper rangolis and enjoys lighting firecrackers.





# PTV (ICSE) students hold the fort at the Killa-making activity

On October 26, the Secondary section students of Parle Tilak Vidyalaya (ICSE) were engaged in a unique and spirited 'Inter House Killa-Making Activity'. The main aim of the activity was to infuse a sense of festivity and creativity, which was a joyful prelude to the Diwali celebrations. The event showcased the rich cultural tapestry of our nation, as students from different houses enthusiastically worked together to craft traditional 'killas'. The theme taken by the houses was 'JALDURGA' (SEA FORTS). Each house presented a unique feature of Shivaji Maharaj's Maratha Navy through the miniature forms of Sindhudurg, Vijay Durg, Khanderi and Suvarna Durg.












## मी जाणले शिवराज असे



बहुजन हिताय जगला
वसुधातलावर देव झाला
जनसेवेमाजी रमला
असा एक शिवराज झाला

त्यासी शतशत नमामि
त्यासी ओज दिसे मज श्रीरामी
गुणवर्णन काय करू मी
मम शौर्य पडे त्याला नित्य कमी

श्रीरामाचा धर्म असे
अंजनी सुताचे बळ असे
रुद्राचा अवतार भासे
इंद्राचे राज्य भूवर वसे

यवन कापे 'शिव' नामाने
केला असा पराक्रम योग्याने
जाणता राजा नाम राही ध्यानी
शिवकल्याण राजा भासे नामाप्रमाणे

- शर्व भावे, ९ वी ब, पार्ले टिळक विद्यालय (आय.सी.एस.ई.)

# आजी, नातू आणि दिवाळी



**अनुराग:** आजी, कधी एकदा परीक्षा संपून सुट्टी लागते असे झाले आहे मला!

**आजी :** आता थोडे दिवस भरपूर अभ्यास कर. मग दिवाळीचे पाच-सहा दिवस खूप मजा करायची आहे ना?

**अनुराग :** ए आजी, आपण सगळे सण एक एक दिवस साजरे करतो पण मग दिवाळीच का एवढे पाच दिवस साजरी करतो गं?

**आजी :** दीपावली म्हणजेच दिवाळी हा आपल्या देशातील महत्त्वाचा सण आहे. आपला देश हा कृषिप्रधान देश आहे. अश्विन महिन्याच्या पौर्णिमेचा मुहूर्त धरून शेतात तयार झालेल्या धान्याची कापणी करून त्याची पूजा केली जाते. ह्या पौर्णिमेला नवान्न पौर्णिमा असे म्हणतात. आपण सामान्यपणे त्याला कोजागिरी पौर्णिमा म्हणतो. आणि म्हणून हा आनंदोत्सव दिवाळीच्या पाच दिवसात साजरा करण्याची परंपरा आहे. शेतात आलेल्या बहराचा, सुगीचा हंगाम असतो, वातावरण प्रसन्न असते, कष्टकरी शेतकऱ्याला विसाव्याचे काही क्षण मिळतात आणि म्हणून सगळी लोकं आनंदात, प्रसन्न असतात. एकमेकांना शुभेच्छा देतात आणि या साऱ्यातून पुन्हा पुढच्या वर्षी भरपूर कष्ट करण्याची ऊर्जा मिळवतात.

**अनुराग :** दिवाळीच्या प्रत्येक दिवसाचे विशिष्ट महत्त्व आहे का? असे असेल तर मला प्रत्येक दिवसाचे महत्त्व सांग ना.

**आजी :** दिवाळीची सुरुवात वसुबारस म्हणजेच गोवत्स द्वादशी पासून होते. या दिवशी गाय आणि तिचे वासरू ह्यांची पूजा केली जाते आणि सणासाठी केलेल्या फराळी पदार्थांचा तिला नैवेद्य दाखवला जातो. हा दिवस म्हणजे अश्विन कृष्ण द्वादशी होय. हा दिवाळीचा पहिला दिवस.

यानंतरचा दिवस अश्विन कृष्ण त्रयोदशी, त्याचं प्रचलित नाव आहे धनत्रयोदशी. याच दिवशी समुद्रमंथनातून प्रकट झालेल्या धन्वंतरी देवतेची पूजा केली जाते. आपल्या देशात पूर्वापार आयुर्वेदिक पद्धतीने वैद्यकीय उपचार केले जातात. धन्वंतरी म्हणजे वैद्य. या दिवशी धणे आणि गूळ ह्याचा नैवेद्य दाखवला जातो. अश्विन महिन्यापर्यंत असलेली उष्णता दूर करण्यासाठी धणे आणि येणाऱ्या कार्तिक महिन्यापासून सुरू होणारी थंडी आणि त्यासाठी लागणारी ऊर्जा मिळवण्यासाठी गूळ असे याचे महत्त्व आहे.

त्यानंतरचा दिवस म्हणजे नरक चतुर्दशी. या दिवशी श्रीकृष्णाने नरकासुराचा वध केला होता म्हणजेच दुष्ट शक्तींचा नाश केला होता. ह्याचे प्रतीक म्हणून आपल्याकडे चिरांटे नावाचे छोटे फळ पायाच्या अंगठ्याने दाबून चिरडण्याची प्रथा आहे. या दिवशी सूर्योदयापूर्वी सर्वांनी लवकर उठून अभ्यंगस्नान करून देवळात जायचे असते. अभ्यंगस्नान म्हणजे अंगाला तेलाने मालिश करून, सुगंधी उटणे लावून, गरम पाण्याने स्नान करायचे असते. शरद ऋतुत शुष्क झालेली त्वचा तेलामुळे मुलायम होते.

दीपोत्सवाचा पुढचा दिवस म्हणजे लक्ष्मी पूजन. या दिवशी संध्याकाळी घरोघरी धनाची किंवा लक्ष्मीची पूजा केली जाते.

यानंतर येतो दिवाळीतला पाडवा! हा बळीराजाचा दिवस म्हणूनही ओळखला जातो. बळीराजा असूर कुळातला असला तरीही अत्यंत दानशूर होता. या दिवशी बटू रूपात वामनाने तीन पावले जमीन मागून बळीराजाला पाताळात पाठवले होते अशी पौराणिक कथा आहे; म्हणूनच या दिवसाला बलिप्रतिपदा असेही म्हणतात. ह्याच दिवशी विक्रम संवत्सर सुरू होत असल्यामुळे व्यापारी वर्ग आपल्या दुकानातील किंवा ऑफिसमधील खतावण्यांची म्हणजेच हिशोबाच्या वह्यांची पूजा करून नवीन वर्षाची सुरुवात करतात. हा दिवस साडेतीन मुहूर्तांपैकी एक समजला जातो. या मुहूर्तावर शुभकार्याची सुरुवात केली जाते. घरोघरी स्त्रिया आपल्या पतीला ओवाळून त्याच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना करतात.

**अनुराग :** आणि याच दिवशी बाबा आईला छानशी भेटवस्तू देतात ना?

**आजी :** हो बरोबर! आणि यानंतर येतो भाऊ बहिणींच्या भेटीचा दिवस म्हणजे भाऊबीज. या दिवसाला यम द्वितीया असेही म्हणतात. या दिवशी यमराज त्यांची बहीण यमी म्हणजे यमुना नदीकडे ओवाळणीसाठी जातात, असं म्हणतात, घरोघरी बहिणी आपल्या भावांना ओवाळतात, त्यांच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना करतात. भाऊही प्रेमाने बहिणींना ओवाळणी घालतात.

अशाप्रकारे हा पाच दिवसांचा दीपोत्सव आनंदात, उत्साहात, दिव्यांच्या झगमगाटात, घरापुढे रांगोळ्या काढून, फराळाचे विविध पदार्थ करून जल्लोषात साजरा केला जातो .

**अनुराग :** दिवाळीत सगळे नातेवाईक, मित्रमैत्रिणी एकत्र भेटून खूप मजा करतात म्हणून मला दिवाळी हा सण खूपच आवडतो.

**आजी- अनुराग,** आपण दिवाळी खूप आनंदात साजरी करतो; पण ज्या लोकांना दिवाळी साजरी करता येत नाही त्यांच्या आयुष्यात आनंदाचे दीप आपण लावले पाहिजेत. ज्या समाजात आपण राहतो, वाढतो त्या समाजातील दुर्बल घटकांपैकी एकाच्या जरी चेहऱ्यावर आपण हसू आणू शकलो तर आपण दिवाळी खऱ्या अर्थाने साजरी केली असं म्हणता येईल.

**(PTVEMS शाळेतील इयत्ता ९वी ड चा विद्यार्थी अनुराग चाफेकर याने त्याची आजी श्रीमती. शैला चाफेकर यांच्याबरोबर केलेला संवाद)**

# अभ्यंग स्नान आरोग्याला वरदान...

दिवाळी म्हटलं की अभ्यंग स्नान आणि अभ्यंग स्नान म्हटलं की "उठा उठा दिवाळी आली मोती स्नानाची वेळ झाली" हे शब्द आठवतात आणि आपण चटकन मोती साबण आणून आंघोळीची तयारी करू लागतो. परंतु खरंतर अभ्यंग स्नान म्हणजे काय? व ते का करायचे? हे आज आपण जाणून घेऊया.

आपल्या मराठी पंचांगाप्रमाणे एका वर्षात सहा ऋतू येतात. वसंत, ग्रीष्म, वर्षा, शरद, हेमंत व शिशिर. यातील शरद ऋतूत येणारा दिवाळी हा सण. साधारणपणे या ऋतूत पावसाळा संपून हिवाळ्याची सुरुवात होण्यापूर्वीचे उष्ण व कोरडे हवामान असते. अशा या कोरड्या हवामानामुळे आपली त्वचा ही कोरडी पडून भेगा पडू लागतात. त्वचेचा दाह होऊ लागतो. अशावेळी त्वचेची काळजी घेणे आवश्यक असते. त्वचेची काळजी घेण्यासाठी अभ्यंग स्नान केले जाते.

आता अभ्यंग म्हणजे काय तर अभ्यंग म्हणजे रोजच्या रोज तेल कोमट करून मस्तकापासून तळव्यापर्यंत केलेला मसाज. आपल्या प्रकृतीनुसार कोणते तेल वापरायचे हे ठरवले जाते. परंतु सर्वसाधारणपणे खोबरेल तेलाचा वापर केला जातो. कोमट तेल अंगाला चोळून झाल्यावर साधारण अर्ध्या तासानंतर अंगाला छान उटणं लावून कोमट पाण्याने अंघोळ करावी. आता हे उटणे बाजारातून आणण्यापेक्षा आपण ते घरीच तयार करू शकतो. आयुर्वेदिक डॉक्टरांकडून जर आपल्या प्रकृतीला मानवणाऱ्या औषधींची माहिती घेतली तर अधिकच उत्तम. साधारणपणे उटण्यात पुढील औषधे वापरली जातात - त्रिफळा, आवळकाठी, सारिवा, वाळा, नागरमोथा, ज्येष्ठमध, सुगंधी कचोरा, आंबेहळद, तुळस, कापूर इत्यादी..

आता आयुर्वेदानुसार प्रत्येक गोष्टीला किंवा औषध घ्यायची अशी एक योग्य वेळ असते. मग अभ्यंग स्नान कधी करावे?



तर पहाटे लवकर उठून प्रातः विधी आटपून मगच अभ्यंग स्नान करावे. खरंतर अभ्यंग रोज करावे परंतु तसे जमत नसल्यास आठवड्यातून किमान दोन ते तीन वेळा करावे. लहान मुलांना उटणं लावताना त्या चूर्णात तेल, दूध अथवा नारळाचे पाणी मिसळावे.

आताच्या धकाधकीच्या आयुष्यात आपणा सर्वांना या बहुगुणी गोष्टी करण्यास अजिबात वेळ पुरत नाही त्यामुळे आपला ओढा बाजारात मिळणाऱ्या तयार वस्तूंकडे असतो. त्यामुळेच हल्ली बाजारात मिळणारे तयार सुगंधी तेल व उटणेयुक्त तयार साबण आपण विकत घेतो. परंतु ते खरंच

**आता तुम्हाला प्रश्न पडला असेलच या अभ्यंग स्नानाचे फायदे काय?**

**१. त्वचेचा कोरडेपणा नष्ट होतो.**
**२. त्वचेवरील सुरकुत्या कमी होण्यास मदत होते.**
**३. रक्तप्रवाह सुधारतो.**
**४. वातदोष कमी होतो.**
**५. रक्ताभिसरण सुधारल्यामुळे शांत झोप लागते व मनावरचा ताण कमी होण्यास मदत होते.**
**६. ह्या सर्व गोष्टींमुळे मन प्रसन्न राहते.**

१००% केमिकल विरहित असते का?

आपण या बहुगुणी व एवढे फायदे असणाऱ्या अभ्यंग स्नानाचा सर्वजण लाभ घेऊ व या दिवाळीत आपण केमिकलयुक्त वस्तू वापरून अभ्यंग स्नान करण्याऐवजी शेकडो वर्षांची परंपरा असणाऱ्या आपल्या भारतीय आयुर्वेदात सांगितल्याप्रमाणे शास्त्रशुद्ध अभ्यंग स्नान करूया आणि सुदृढ आयुष्य जगण्याचा प्रयत्न करूया...

आपणा सर्वांना पार्ले टिळक विद्यालय परिवाराकडून दिवाळीच्या खूप खूप शुभेच्छा

आणि

आपणा सर्वांना सुदृढ आयुष्य लाभो हीच देवाचरणी प्रार्थना....

**- सौ. मधुर मनोजव करंबेळकर,**
**PTVEMS (Primary section)**

# दिवाळी फराळाची हास्यजत्रा

अभ्यंग स्नान झाले आणि आजी, आईने घरातल्या सगळ्यांना फराळाची ताटे आणून दिली. छोट्या रिमाने नाखुशीनेच ते हातात घेतले आणि काय आश्चर्य!ताटातले ते सगळे पदार्थ तिच्याकडे टकामका बघायला लागले आणि त्यांनी बोलायला सुरुवात केली.



**लाडू:** "काय गं रिमा, आम्ही आवडत नाही वाटतं तुला?"

**चकली:** "नेहमी नेहमी आम्हाला खाऊन कंटाळलीस की काय? पण आमचं दिवाळीतलं महत्त्व तर जाणून घे."

**लाडू:** "आम्हा सर्वांची परंपरा फार जुनी आहे. अकराव्या शतकातल्या 'भोजन कुतूहल' या ग्रंथात दिवाळीच्या फराळाचा उल्लेख आला आहे."

**करंजी:** "जगप्रवासी 'आल्बेरूनी' याने आपल्या प्रवास वर्णनात आमच्याविषयी सांगितलं आहे."

**रिमा:** "ते ठिक आहे, पण आताच्या काळाचं काय!"

**शंकरपाळी:** "अगं रिमा, दिवाळी हा सण थंडीत येतो. शरीरातली ऊर्जा वाढवण्यासाठी पौष्टिक आहार शरीराला मिळावा यासाठी पूर्वी गहू, तांदूळ, चणाडाळ, तूप, गूळ असे पदार्थ वापरून फराळ बनवला जायचा."

**रिमा:** "पण निसर्गाच्या बदलत्या ऋतूचक्रानुसार आता तर दिवाळीत कधी ऊन तर कधी पाऊस पण असतो."

**लाडू:** "म्हणून तर आता आमच्या रूपात पण स्थित्यंतरं झाली आहेत. अगं चकलीताई, सरक ना जरा. तुझे काटे टोचतात मला!"

**चकली:** "ए गप रे! गोलमटोल लाडोबा! तुझ्या कितीतरी प्रकारांनी जागा व्यापली आहे बघ! कळीचा, बेसनाचा, रव्याचा, पौष्टिक पिठाचा तर ड्रायफ्रूटचा सुद्धा नाना प्रकार तुझे!

**करंजी :** "आणि तुझं काय? तुझी पण किती रुपे! पण काटे काही जायचे नाहीत."

**चकली:** "अरे ती तर माझी पहचान आहे! जेवढे छान काटे चकलीला, तेवढी बनवणारी सुगरण! आणि बरं का जितकी नावे तितकी रुपे. मुरुक्कू, चक्रिका, चकुली ते चकली असा माझा प्रवास झालाय. खमंगपणा आणि कुरकुरीतपणात माझा नंबर पहिला!"

**लाडू:** "असू दे, असू दे. मी पण काही कमी नाही म्हटलं! सुश्रुताच्या काळापासून माझी सुरुवात





झाली आहे. शस्त्रक्रियेनंतर रुग्णांना देण्याच्या पौष्टिक पदार्थांची गोळी हे माझे सुरुवातीचे रूप होते. तुम्हाला माहित आहे का आधीचं माझं नाव होतं 'मोदक'."

**रिमा:** "काय खरंच?"

**करंजी:** "आम्ही पण आहोत म्हटलं इथे! माझं सुरुवातीचं नाव शष्कुली होतं. उत्तर प्रदेशातून माझ्या वापराला सुरुवात झाली. माझ्यातल्या पौष्टिक पदार्थांमुळे मोडलेल्या हाडांना सांधणारी, पित्त आणि वातदोष कमी करणारी म्हणून माझ्याकडे पाहिलं जातं."

**शंकरपाळी:** "आणि मी रे बाबांनो? खजूऱ्या, कापण्या ते नमकीन आणि विविध स्वादाच्या रूपात मला बनवलं जातं. प्रवासात आवडीने सोबत नेलं जातं. खुसखुशीतपणात माझं उदाहरण दिलं जातं."

**चिवडा:** "अरे तुम्ही सगळे आपापसात बोलत बसलात, पण कोणी पाहिलं आहे का सगळ्यांच्या ताटातला संपत आलेला पदार्थ कोणता आहे? खरं तर माझ्या एवढी निरनिराळी रूपं कोणाचीच नाहीत. अगदी झटपट तयार होणारा मी म्हणजे चुरचुरीत, कुरकुरीत, खमंगपणाच. सस्ता और टिकाऊ माल बरं का !"

**अनारसे:** "चालू द्या तुमचं. पण माझी तर बातच कुछ और आहे. सुगरणीच्या पाककलेची परीक्षा घेणारा मी चोखंदळांच्या पसंतीचा आहे म्हटलं!"

**रिमा:** "हो रे बाबांनो, हो. पटलं बरं मला तुमचं महत्त्व! म्हणून तर आई आणि आजीने आजच्या काळानुसार शरीराला मानवतील असे पदार्थ वापरून हे फराळाचं ताट सजवलं आहे. चला आता, मीच घेते तुमचा समाचार!"

**- लता सूर्यवंशी**
**पार्ले टिळक विद्यालय,मराठी माध्यमिक विभाग**

# नवढंग दिवाळीचा

**दसरा कोजागिरीनंतर**
**लागतात दिवाळीचे वेध**
**सणांच्या ह्या राजाकडे**
**जाती-धर्मात नसतो भेद||**

**इवल्या इवल्या दिव्यांची**
**काय वर्णावी बात!**
**परमार्थाने स्वतः जळतात**
**पण तिमिरावर करती मात||**



**अंधश्रद्धा आणि भ्रष्टाचार**
**समाजातील अंधकार**
**समुपदेशन रुपी दिव्यांनी**
**राष्ट्र विकासाला लावू हातभार||**

**ध्वनी प्रदूषण नि वायू प्रदूषण**
**नक्कीच सारे मिळून टाळू**
**गाय,पती,भाऊ नि तुळस**
**निरपेक्षपणाच्या निरंजनाने ओवाळू ||**

**कु. गौरी दिलीप पाटकर (९/४), पार्ले टिळक विद्यालय,मराठी माध्यमिक विभाग.**




# दिवाळी अंक
# उत्तम साहित्याचं शिखर

एखाद्या समाजाची संस्कृती, मूल्यं ही नेहमी भाषेतून व्यक्त होतात. भाषाव्यवहार जेवढा समृद्ध, तेवढी संस्कृती समृद्ध आणि हेच साहित्यिक - सांस्कृतिक रूप दिवाळी अंकाच्या निमित्ताने समोर येत असते. दिवाळी अंक हे वर्षभरातल्या उत्तम साहित्याचं शिखर. त्यामुळेच त्यांच्याविषयी उत्सुकता अधिक आणि त्याचं मोलही अधिक.

दिवाळी अंक हे मराठी वाङ्मयीन संस्कृतीचे वैशिष्ट्यपूर्ण अंग आहे. दिवाळी सणाच्या सुमारास दिवाळी अंक प्रकाशित होतात. महाराष्ट्रात दिवाळी सणाचा वेगळाच पैलू पुढे येतो. ज्याला महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासात अत्यंत मानाचे स्थान आहे. हा पैलू म्हणजे 'दिवाळी अंक'.

भारतीय छपाईच्या इतिहासात वाचन परंपरेचा एक मोठा आयाम दिवाळी अंकाने व्यापला आहे. मराठी भाषेतच हे पाहायला मिळते. दिवाळी अंकाची सुरुवातच साहित्यिक प्रेरणेतून झाली. दिवाळी अंकाचा पहिला मान लेखक श्री. काशिनाथ रघुनाथ मित्र यांनी संपादित केलेल्या आणि १९०९ सालच्या दिवाळीत प्रकाशित झालेल्या 'मनोरंजन' या दिवाळी अंकास जातो. तो व्यक्तिचित्र विशेषांक होता. अमेरिकेतील नाताळ विशेषांकावरून त्यांना ही कल्पना सुचली. तो त्यांनी विनामूल्य उपलब्ध करून दिला होता. हळूहळू इतरही मासिकांनी दिवाळी अंक काढायला सुरुवात केली. १९३२ पर्यंत बऱ्याचशा मासिकांनी दिवाळी अंक काढायला सुरुवात केली होती.

दिवाळीचा फराळ, मिठाई, याबरोबर दिवाळी अंक हा सुशिक्षित व साहित्यप्रेमींसाठी एक आवश्यक घटक बनला आहे. पूर्वीच्या दिवाळी अंकांत मनोरंजनासमवेतच परंपरा, संस्कृती याची माहिती असे. काळानुरूप त्यात बदल झाला आहे. दिवाळी अंकांनी वाचकांना वाङ्मयीन दृष्टी दिली. वाचक अभिरुचीवर संस्कार करणे आणि लेखकांना नवनिर्मितीसाठी उद्युक्त करणे अशी दुहेरी जबाबदारी दिवाळी अंकांनी समर्थपणे पेलली आहे. १९०५ साली श्री. बाळकृष्ण विष्णू भागवत यांच्या 'मित्रोदय' या मासिकाने दिवाळी विशेष अंक काढला होता. 'नोव्हेंबर दिवाळी प्रित्यर्थ' असा उल्लेख या मासिकावर होता. पूर्णपणे वाङ्मयाला प्राधान्य देणारा हा अंक होता. २४ पानांच्या या अंकात कादंबरी, चरित्र, वैचारिक निबंध असा मजकूर होता.

'किर्लोस्कर'चा दिवाळी अंक अतिशय लोकप्रिय होता. त्याच काळात 'विविधवृत्त', 'यशवंत', 'अरुण', 'ज्योत्स्ना', 'प्रतिभा', 'चंद्रिका', 'पारिजात', 'गृहलक्ष्मी' असे दिवाळी अंक प्रसिद्ध झाले खरे, पण खऱ्या अर्थाने दिवाळी अंक बहरले ते स्वातंत्र्योत्तर काळात. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर राजकीयच नव्हे तर सर्वच क्षेत्रांत मुक्ततेचं, आत्मप्रत्ययाचं, मोकळ्या आत्माविष्काराचं वातावरण आलं आणि मराठी साहित्याचं रूप पालटण्यास प्रारंभ झाला. याला कारणीभूत ठरले ते दिवाळी अंकच. आणि त्यातही आपला ठसा उमटवला तो दीनानाथ दलाल यांच्या 'दीपावली' या दिवाळी अंकाने. 'दीपावली' हा पहिला दिवाळी-वार्षिक विशेषांक.

